# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २१४–२०१०/ दिनांक :

श्री. सुरेश कांतिलाल टेके,
३२९, सोमवार पेठ, माधवनगर,
ता. मिरज, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण विभागीय कार्यालय, सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, विश्रामबाग, सांगली — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सुरेश कांतीलाल टेके, रा. माधवनगर यांनी त्यांच्या मालकीच्या मौंजे चिंचणी, ता. तासगांव, जि. सांगली येथील गट क्र. ६४२ मध्ये महावितरणने बसविलेल्या वितरण रोहित्राचे जागेचे विनियमानुसार भाडे मिळणेबाबतची तक्रार ‘ क्ष ‘ फॉर्ममध्ये अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. २६.७.२०१० रोजी दाखल झाली होती. त्यावर कक्षाने दि. २१.८.२०१० रोजी निर्णय दिलेला आहे. कक्षाचा निर्णय मान्य न झाल्यामुळे तक्रारदाराने मंचाकडे दि. २७.९.२०१० रोजी अपील दाखल केले.

सदर तक्रारीची सुनावणी दि. ९.११.२०१० रोजी कोल्हापूर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदारातर्फे प्रतिनिधी श्री. प्रताप होगाडे, अध्यक्ष, महाराष्ट्र वीज ग्राहक संघटना इचलकरंजी हे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. क्षिरसागर, कार्यकारी अभियंता / नोडल ऑफीसर सांगली हजर होते.

सुनावणीच्या वेळेस तक्रारदार प्रतिनिधी यांनी सांगितले की, मौंजे चिंचणी गट क्र. ६४२ येथे मे. कृषीरत्न कोल्ड स्टोअरेज या नावाने दि. १८.५.२००१ रोजी कनेक्शन दिले म्हणून महावितरणने त्यासाठी रोहित्र बसविले आहे. मा. आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ मधील विनियम क्र . ५.५ मधील तरतुदीनुसार वितरण रोहित्रासाठी वापरात असलेल्या तक्रारदाराच्या मालकीच्या जमीनीचे बाजारभावानुसार दि. २० जानेवारी २००७ पासून भाडे मिळावे व त्या संदर्भात भाडे करार करावा अशी मागणी केली.

वितरण कंपनीतर्फे श्री. क्षिरसागर यांनी बाजू मांडली. त्यांनी मागणीनुसार विद्युत पुरवठा केल्याचे मान्य केले. परंतु सदर ग्राहक हा उच्चदाब ग्राहक असल्यामुळे त्यांनी स्वतःच्या जागेत स्वतःचे रोहित्र बसवून घेतले. ते वितरण कंपनीकडून पुरविले गेले नाही. त्यामुळे कंपनी कोणतेही जागेचे भाडे देणे लागत नाही. त्याप्रमाणे मंचाने आदेश द्यावेत.

तक्रारदार प्रतिनिधी यांचे समाधान झाल्यामुळे त्यांनी तक्रार मागे घेत असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदाराचे पत्र दि. १६.११.२०१० रोजी मंचाकडे प्राप्त झाले. त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढणे योग्य होईल.

## आदेश

१) तक्रारदाराने तक्रार मागे घेतल्यामुळे तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक : ( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष